**BY RPAD**


# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)

५८३/ब, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे ४११०३७

दूरध्वनी ०२०-६६२६६८५०/८५५ फॅक्स : ०२०-६६२६६८४८,६६२६६८२९

Email: - mswcinfo@mswarehousing.com, mswc2k@yahoo.com

Website: mswarehousing.com


जा.क्र.मरावम/क/बांधकाम/ २५०८ दि.२२ /०८/२०१४

प्रति,

श्री. बी.डी. अनपट

पो. कोंडबाबी ता. अकलूज

जि. सोलापूर

विषय :- कराड जि. सातारा येथील वखार संकुलातील देखभाल दुरुस्तीची एमएसीपी अंतर्गतची काम (कामाची किंमत रु. १२,१०,४१०/-)

कामाचे अंतिम देयक आहे त्या स्थितीत करणेबाबत - - - -

संदर्भ :- क्र.मरावम/विका/कोवि/१०१४ दि. ०६/०८/२०१४

महोदय,

उपरोक्त काम हे आपणांस दि.१०/०१/२०१३ ते दि. ०९/०५/२०१३ पर्यंत ४ महिन्याच्या मुदतीने करण्यासाठी देण्यात आले होते. सदरच्या कामामध्ये तळवट दुरुस्तीच्या बाबींचा समावेश होता.

वरील काम हे वेळेत करणे गरजेचे होते. परंतु आपण हे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी आपणांस वारंवार सुचित करण्यात आले. मात्र त्यावर आपणांकडून काहीच कार्यवाही झाली नाही. त्यांनतर उपव्यवस्थापक (अभि) ह्यांच्या अहवालानुसार कराराच्या कलम 12-2 (a) & 12-2 (c) नुसार ठेका रद्द करण्याल येईल, अशी नोटीस आपणांस देण्यात आली.

त्यानंतरही आपण काम पूर्ण केले नाही म्हणून संदर्भिय पत्रानुसार उपव्यवस्थापक (अभि) ह्यांनी कळविले आहे की, कंत्राटदार काहीच प्रतिसाद देत नाही व मुख्य कार्यालयाच्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

उपरोक्त कामाच्या करारामध्ये पुढीलप्रमाणे तरतुदी आहेत.

**कलम ७** - रु. ६०५/- प्रतिदिन ह्याप्रमाणे दंडात्मक कारवाई, दंडात्मक कारवाईची रक्कम निविदा रकमेच्या २% पर्यंत पोहचली तर त्यानंतर काम केव्हाही रद्द करता येऊ शकते.

**कलम १२.२** — कंत्राटदाराने २८ दिवसांपेक्षा जास्त दिवस काम बंद ठेवले तर करार रद्द होऊ शकतो. कामामध्ये निर्माण झालेल्या त्रुटी विहित वेळेत दूर केल्या नाही तर ठेका रद्द होऊ शकतो.

प्रस्तुत प्रकरणात आपल्याला नोटीस देऊन वर ९ महिने अतिरिक्त झाले आहे व तरीसुध्दा काम पूर्ण होण्याची कोणतीही चिन्हे नाहीत. त्यामुळे पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात येत आहे.

- कराराच्या कलम ७ अन्वये रु. ६०५/- प्रतिदिन दंडात्मक रक्कम वसूल करण्यात येईल.
- दंडात्मक रक्कम निविदा रकमेच्या २% इतकी होईपर्यंत वसूल करण्यात येईल.
- आपणांस दिलेले काम रद्द करुन आपण केलेले काम आहे त्या स्थितीत अंतिम करण्यात येत आहे. त्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाशी संपर्क साधावा.
- आपणांस महाराष्ट्र राज्य वखार महामंडळात कामे करण्यासाठी १ वर्षाची बंदी घालण्यात येत आहे.

आपला विश्वासू

महाव्यवस्थापक (अभि)

प्रत :-